**L. A. BILL No. LXXVII OF 2025.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA CONTROL OF ORGANISED CRIME ACT, 1999.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७.**

**महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९९९ चा महा. ३०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(शा.म.मु.) एचबी ७६८–१ (१०४५–७-२०२५)

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ याच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ङ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९९९ चा महा. ३०.

"(ङ) "संघटित गुन्हेगारी" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने, एकतर संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा अशा संघटनेच्या वतीने, एकट्याने किंवा संयुक्तपणे,—

(एक) स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी आर्थिक लाभ मिळविण्याच्या, किंवा गैरवाजवी आर्थिक किंवा इतर फायदा मिळविण्याच्या किंवा उठाव करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, हिंसाचाराचा वापर करून किंवा हिंसाचार करण्याची धमकी देऊन किंवा धाकदपटशा किंवा जबरदस्ती करून, अथवा अन्य बेकायदेशीर मार्गानी; किंवा

(दोन) स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी आर्थिक लाभ मिळविण्याच्या, किंवा गैरवाजवी आर्थिक किंवा इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने, अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ याचे किंवा त्याखाली केलेले नियम यांचे उल्लंघन करून, उक्त अधिनियमान्वये अधिसूचित केल्याप्रमाणे, वाणिज्यिक प्रमाणात अंमली औषधिद्रव्ये किंवा मनःप्रभावी पदार्थ यांची लागवड करून, त्यांचे उत्पादन करून, त्यांची निर्मिती करून, ते जवळ बाळगून, त्यांची विक्री करून, ते खरेदी करून, त्यांची वाहतूक करून किंवा त्यांची साठवणूक करून, १९८५ चा ६१.

चालू ठेवलेले कोणतेही बेकायदेशीर कृत्य, असा आहे;".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

सुपारी घेऊन हत्या करणे, जबरीने पैसे उकळणे, निषिद्ध मालाची तस्करी करणे, अंमली पदार्थांचा बेकायदेशीर व्यापार करणे, खंडणीसाठी अपहरण करणे, इत्यादी मार्गांनी निर्माण केलेल्या बेकायदेशीर संपत्तीचा स्रोत असलेल्या संघटित गुन्हेगारीचा मुकाबला करण्यासाठी किंवा तिचे नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (१९९९ चा महा. ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मकोका अधिनियम" असा केला आहे) अधिनियमित करण्यात आला आहे.

२. अलिकडच्या काळात, अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थांची वाढती लागवड, त्यांचे उत्पादन, त्यांची निर्मिती, ते जवळ बाळगणे, त्यांची विक्री किंवा त्यांची वाहतूक यांमुळे, समाजाला अतिशय गंभीर धोका उद्‌भवला आहे. तरुण व्यक्ती मोठ्या संख्येने अंमली पदार्थांच्या सेवनास बळी पडत असल्याचे आढळून आले आहे. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे केवळ लोकांचे आरोग्य व स्वास्थ्यच धोक्यात येत नाही तर, सामाजिक संरचनेचा देखील ऱ्हास होत आहे.

असे निदर्शनास आले आहे की, अनेक संघटित गुन्हेगारी संघटना, कार्यान्वित नसलेल्या काही आजारी व निष्क्रिय रासायनिक उत्पादन निर्मिती कारखान्यांचा वापर, अंमली औषधिद्रव्ये व मनः प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "एनडीपीएस अधिनियम" असा केला आहे) अन्वये प्रतिबंधित केलेल्या अंमली पदार्थांच्या निर्मितीसाठी करीत असल्याचे अनेकदा आढळून आले आहे. निषिद्ध मालाच्या तस्करीतून व अंमली पदार्थांच्या बेकायदेशीर व्यापारातून प्रचंड प्रमाणात बेकायदेशीर संपत्ती निर्माण केली जाते आणि अतिरेकी व इतर बेकायदेशीर कृत्यांसाठी तिचा वापर केला जाण्याचा संभव आहे. यामुळे, केवळ राज्याच्या अर्थव्यवस्थेवरच विपरीत परिणाम होत नाही तर, सार्वजनिक सुरक्षिततेला व सुरक्षेला देखील धोका निर्माण होत आहे.

३. मकोका अधिनियमाच्या कलम २(१)(घ) मध्ये, "चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य" या संज्ञेची व्याख्या, ज्याच्या बाबतीत मागील दहा वर्षांच्या कालावधीत, एकापेक्षा अधिक आरोपपत्रे सक्षम न्यायालयापुढे दाखल करण्यात आलेली असतील आणि अशा अपराधाची त्या न्यायालयाने दखल घेतलेली असेल असे, संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा अशा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे हाती घेतलेले, दखलपात्र अपराध असून तीन किंवा त्याहून अधिक वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेले व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे प्रतिषिद्ध ठरविण्यात आलेले कृत्य, अशी केली आहे. एनडीपीएस अधिनियमाखालील अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थांशी संबंधित असलेले अपराध, मकोका अधिनियमाअंतर्गत समाविष्ट असण्याबाबत अधिक स्पष्टता आणण्यासाठी, मकोका अधिनियमातील "संघटित गुन्हेगारी" या व्याख्येत सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ७ जुलै २०२५.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

**सन २०२५ चे वि. स. विधेयक क्रमांक ७७.— महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ यातील उतारे)**

**(सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०)**

**१.** * * * *

**२. या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—** व्याख्या.

**(क)** ते **(घ)** * * * *

(**ङ**) "संघटित गुन्हेगारी" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने अवैध मार्गांनी आर्थिक लाभ मिळविण्याच्या किंवा स्वतःसाठी किंवा कोणत्याही अन्य व्यक्तींसाठी गैरवाजवी आर्थिक किंवा इतर फायदा मिळविण्याच्या किंवा उठाव करण्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एक तर संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा अशा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करून किंवा हिंसाचार करण्याची धमकी देऊन किंवा धाकदपटशा किंवा जबरदस्ती करून किंवा अन्य बेकायदेशीर मार्गांनी चालू ठेवलेले कोणतेही बेकायदेशीर कृत्य, असा आहे ;

**(च)** ते **(छ)** * * * *

**३.** ते **३०.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७.]**

**[ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९
यात सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.